दिनांक.०९/१०/२०१८

# प्रेसनोट

## काञज परिसरात चोरी करणारा अल्पवयीन मुलगा ताब्यात

### १४ मोबाईल व १ लॅपटॉप असा कि.रु १,८९,०००/- चा मुद्देमाल जप्त

दि.०९/१०/२०१८ रोजी भारती विद्यापिठ पोलीस ठाणे हददीत गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन तपास पथकाचे पो.उप-निरीक्षक शिवदास गायकवाड व त्यांचे कर्मचारी पेट्रोलींग करीत असताना पोलिस कर्मचारी **विनोद भंडलकर** यांना माहीती मिळाली की, एक अल्पवयीन मुलगा गुजरवाडी फाटा येथे पाठीला काळे रंगाची सॅग लावून थांबलेला असुन त्याचे सॅगमध्ये चोरी केलेले मोबाईल व लॅपटॉप असून तो ते विकण्यासाठी गि-हाईक शोधत आहे अशी माहीती मिळाल्याने लागलीच सदरची बातमी मा वरिष्ठांना कळविली असता त्यांनी खात्री करुन योग्य ती कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केलेनंतर लागलीच आम्ही स्टाफ, असे खाजगी वाहनाने रवाना होवुन गुजरवाडी फाट्याजवळ जावुन वॉच केला असता बातमीतील वर्णनाचा एक अल्पवयीन मुलगा संशयीत रित्या वावरत असताना दिसलेने त्यांस आम्ही हटकले असता तो पळुन जाणेचा प्रयत्न करु लागल्याने त्यांस वरिल स्टाफचे मदतीने ताब्यात घेवून नंतर त्यास पोलीस ठाणे येथे आणून विश्वासात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता तपासदरम्यान त्यांनी सांगितले की, मी सुमारे एक वर्षापासून कात्रज,मांगडेवाडी,गुजरवाडी परिसरात दिवसा व रात्रीचे वेळेस चो-या करीत असलेबाबत कबुली दिल्याने तसेच त्याचे पाठीला असलेली सॅग चेक करता त्याचे मध्ये **एक लॅपटॉप व एकुण १४ मोबाईल** मिळाल्यामुळे त्याचेबाबत खात्री करता त्या लॅपटॉप व मोबाईल बाबत भारती विद्यापिठ पो.ठाणेस गुन्हे दाखल असल्याने त्याची खात्री करून त्यास ताब्यात घेवून तपासादरम्यान त्याचेकडून **एकुण कि.रू.१,८९,०००/- किमतीचे लॅपटॉप व मोबाईल असा मुद्देमाल जप्त** करण्यात आला आहे.

वरील अल्पवयीन मुलाकडून भारती विद्यापिठ पोलिस स्टेशन कडील एकुण २ गुन्हे उघडकीस आले आहेत.त्याचा अधिक तपास चालु असून आणखी मोबाईल चोरल्याचे तो सांगत असून अधिक तपास तपास पथकाचे पो.उप-निरीक्षक शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.रविंद्र रसाळ सो सहा.पोलीस आयुंक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. शिवदास गायकवाड, सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवालदार विनोद भंडलकर,गणेश सुतार,प्रणव सकपाळ,उज्वल मोकाशी, शिवदत्त गायकवाड यांचे पथकाने केलेली आहे.**